Historicity Research Journal Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN : 2393-8900 Volume - 2 | Issue - 11 | July – 2016

# “फलटण तालुक्यातील शेतीच्या विकासामध्ये कृषी सहकारी सोसायटयांचे योगदान (सन १९४८ -२०००)”

**Prof. Dr. S. M. Gavade**
**Head, Dept.of History, Mudhoji College, Phaltan , Dist.Satara.**




**प्रस्तावनाः**

सातारा जिल्ह्यातील फलटण तालुका हा सहकारी तत्वावर विकास घडवून आणणारा तालुका आहे. या तालुक्यात सहकारी चळवळीचा पाया इ.स.१९१८ मध्ये फलटण संस्थानचे अधिपती श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी घातला.आपल्या संस्थानातील शेतकऱ्यांची खाजगी सावकारापासून मुक्तता करावयाची असेल तर सहकारी चवळवळीस प्रोत्साहन दिले पाहिजे. म्हणून दि. फलटण बँक या नावाची बँक स्थापन केली. पुढे ही बँक श्री. लक्ष्मी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक असे तिला नाव दिले याशिवाय १९२५ मध्ये संस्थानामधून निरा उजवा कालवा गेल्याने संस्थानमधील उप गावातील जमीन ओलिताखाली आली. या पाण्याचा पूर्णपणे उपयोग शेतीस करुन घेता यावा व शेतकरी लोकांना भांडवल पुरवठा व्हावा यासाठी वरील बँकेच्या मार्फत संस्थानातील अनेक गावांमध्ये कृषी सहकारी सोसायट्या स्थापन करण्यात आल्या. आपल्या संस्थानातील लोक कर्जबाजारी व्हावेत असे नसून लोक कर्जातून मुक्त व्हावेत. असा सहाकरी सोसायट्यांचा उद्देश असतो. याशिवाय खेडेगावातील लोकात शिक्षण, काटकसरपणा, सहकारी एकोपा इ. गोष्टींचा प्रचार व्हावा. या उद्देशामुळे सहकारी चळवळ यशस्वी होते.[१]

श्रीमंत मालोजीराजांनी संस्थानातील सोसायट्यांचा कारभार अधिक कार्यक्षमपणे चालावा यासाठी सहकारी सोसायट्यांच्या सचिवांकरिता १५ दिवसांचा सहकारी प्रशिक्षण वर्ग सुरु केलेला होता. याशिवाय सहकार चळवळीला उत्तेजन देण्यासाठी संस्थानामध्ये सहकार खाते निर्माण करुन श्री.डी.एम. जोशी यांची लेखापरीक्षक व रजिस्टार म्हणून नेमणूक केली होती. इ.स.१९२९-३० पर्यंत संस्थानात ४४ सहकारी सोसायट्या होत्या. तर १५३६ सहकारी सोसायट्यांचे सभासद होते.[२] वरील माहितीवरुन असे दिसून येते की, संस्थान काळामध्ये सहकारी सोसायट्यांचा कारभार अधिक कार्यक्षमतेने चालत होता. त्यामूळे शेतकऱ्यांचे उत्पन्न जास्त वाढत जाऊन संस्थानाचेही उत्पन्न दुप्पटीने वाढले. पुढे ही ‘श्री लक्ष्मी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक’ सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेत विलीन करण्यात आली.

## सातारा जिल्हा मध्यवर्ती बँक व सहकारी सोसायट्या -

१५ ऑगस्ट १९६१ रोजी फलटण शहरात सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची शाखा सुरु झाली व याच बँकेत ‘श्री लक्ष्मी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेचे’ विलीनीकरण करण्यात आले. सन १९६१ पासून फलटण तालुक्यातील सहकारी सोसायट्यांना कर्जपुरवठा सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेने सुरु केला. या बँकेमार्फत सहकारी सोसायट्या सभासदांना २४ प्रकारची शेतीसाठी कर्जे दिली जातात. त्यामधील महत्वाची कर्जे पुढीलप्रमाणे – १) पीक कर्ज २) कृषी यांत्रिकीकरण ३) केळी लागवड
४) पडिक जमीन विकास ५) रेशीम उद्योग ६) सेंद्रीय शेती, ७) डेरी युनिट ८) उपसा जलसिंचन योजना, तुषार व ठिबक सिंचन येजना, ९) शेतकरी निवास, १०) संकरीत गाई - म्हशी खरेदी, ११)कांदा चाळ, १२) सुशिक्षित बेरोजगार कर्जयोजना, १३) शैक्षणिक कर्ज योजना

वरीलप्रमाणे शेतकऱ्यांना शेतीच्या विकासासाठी कृषी सहकारी सोसायट्यांच्या मार्फत कर्जपुरवठा केला जातो.[३]

## कृषी कर्जाचे प्रकार –

कर्जमागणी करणाऱ्या शेतकरी सभासदांना वेळेवर पुरेसा भांडवलपुरवठा करणे. त्यातून शेतीचा विकास घडवून आणणे हे कृषी विषयक कर्ज धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या कर्जाचे अल्पमुदत कर्ज, मध्यमुदत कर्ज, दीर्घ मुदत कर्ज असे तीन भागात विभाजन

केले आहे. सर्वसाधारणपणे शेतकऱ्यांना अल्पमुदत कर्जाची मदत गरज दोन प्रकारची असते. यामध्ये शेतीच्या मशागतीसाठी लागणारी रोख रक्कम याशिवाय अधिक उत्पादनासाठी लागणारी खते खरेदी करण्यासाठी अल्प मुदत कर्जाची गरज असते.[४] असे कर्ज देताना सर्व बाबींचे पुर्तता कृषी सोसायट्यांना द्यावी लागते. याशिवाय सोसायट्यांचे कर्ज वाटप करताना सभासदांची विभाग, सबल व दुर्बल या दोन गटात केली जाते. दुर्बल सभासद १ हेक्टर पेक्षा कमी जमीन असणारा अत्यल्प भूधारक तर १ ते २ हेक्टर जमीन असणारा अल्प-भू-धारक आणि दोन हेक्टरपेक्षा जादा क्षेत्र धारण करणारा शेतकरी सबल सभासद असतो.[५]

जे व्यवसाय शेतीस पुरक व आवश्यक आहेत. यासाठी मध्यम व दीर्घ मुदत कर्जे दिली जातात. यामध्ये जनावरे खरेदी करणे बैलगाडी कृषी यंत्रे, शेतकरी निवास, ग्रीन हाऊस यासाठी ही कर्जे दिली जातात.[६] विविध कार्यकारी सहकारी सोसायट्या आपापल्या कार्यक्षेत्रातील सर्व शेतकऱ्यांना सभासद करुन घेऊन कोणताही शेतकरी कर्जापासून वंचित राहणार नाही याचीही दक्षता ते घेत असतात. हे कर्ज घेत असताना सभासदाने आपल्या मालकीच्या संपूर्ण क्षेत्राचा इ करार नोंदवून कर्जाचा बोजा सात-बाऱ्यावर नोंदवावा लागतो व सभासद पीक निघाल्यानंतर कर्ज हे भरत असतो. ही कर्जाची फेड करण्यासाठी मालविक्रीशी सांगड घातली जाते. कापूस, ऊस या पिकाची कर्जवसूली साखर कारखान्यातील बिलातून केली जाते.[७] तर मध्यम व दीर्घ मुदतीच्या कर्जाची परतफेड ठराविक कालखंडातील हप्ते बांधून घेऊन करत असतो.

## फलटण तालुक्यातील निवडक कृषी सोसायट्या -

फलटण तालुक्यामध्ये सन २००० सालापर्यंत एकूण ११९ कृषी सहकारी सोसायट्या होत्या.[८] त्या मधील काही निवडक सोसायट्या पुढीलप्रमाणे

### १) तरडगाव विविध कार्यकारी सहकारी सोसायटी -

फलटण तालुक्यातील पश्चिम भागात असलेले तरडगांव मोठे गाव आहे. या गावातील बहुसंख्य लोकांचा व्यवसाय शेती असून गावच्या उत्तर बाजूने निरा उजावा कालवा वाहत आहे. या गावातील ४०% जमीन बागायती आहे. या गावातील शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्यासाठी इ.स.१९१८ मध्ये येथे सहकारी सोसायटी स्थापन करण्यात आली. ही फलटण तालुक्यातील सहकारी तत्वावरील पहिली कृषी सहकारी सोसायटी होय. सन १९१९-२००० या काळात संस्थेचे एकूण सभासद १४४१ असून ३२,९९,४०२ एवढे कर्ज वाटप केले आहे.[९]

### २) राजुरी -

राजुरी हे फलटण तालुक्याच्या पूर्व बाजूकडील व सोलापूर जिल्ह्याच्या सीमेलगत असणारे एक महत्वपूर्ण गाव होय. या गावातील बहुसंख्य लोकांचा व्यवसाय शेती हा आहे. राजुरी गावातून निरा उजवा कालवा जात असल्याने शेतीसाठी मुबलक पाणी उपलब्ध आहे. त्यामुळे ऊस, पालेभाज्या, फळबागा यांची लागवड शेतीतून केली जाते. अशा बागायती पिकांच्या उत्पन्नासाठी भांडवलाची आवश्यकता असल्याने सन १९३७ मध्ये राजुरी विविध कार्यकारी कृषी सहकारी सोसायटीची स्थापना करण्यात आली आहे. सन १९९९ – २००० या काळात या संस्थेचे १०२५ सभासद असून कर्जवाटप १,६१,६६८ रुपये इतके कर्जवाटप केले आहे.[१०]

### ३) उपळवे -

उपळवे हे फलटण तालुक्याच्या दक्षिण बाजुकडील एक महत्वपूर्ण गाव असून तेथील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. येथे जिरायती पिके घेतली जातात. विहिरीच्याद्वारे शेतीला पाणी पुरवठा केला जातो. तेथील शेतकऱ्यांना भांडवलपुरवठा करण्यासाठी सन १९५९ मध्ये उपळवे विविध कार्यकारी कृषी सहकारी सोसायटीची स्थापना करण्यात आली या संस्थेचे एकूण ८७० सभासद असून १६,००,००० रुपये कर्जवाटप करण्यात आले आहे.[११]

### ४) होळ -

होळ हे गाव फलटण तालुकयाच्या उत्तर बाजूस असून हे निरा नदीच्या काठी वसलेले आहे. निरा उजवा कालव्याच्या लाभक्षेत्रात हे गाव येत असल्याने येथील बहुसंख्य लोकांचा व्यवसाय शेती आहे. येथे मोठया प्रमाणात ऊसाची लागवड केली जाते. ऊस पिकाला भांडवल पुरवठा करण्यासाठी इ.स.१९२५ मध्ये होळ विविध कार्यकारी कृषी सहकारी सोसायटीची स्थापना करण्यात आली या संस्थेचे सन २००० अखेर २.०७८ शेतकरी सभासद असून ४ कोटीच्या पुढे कर्ज वाटप करण्यात आले आहे.[१२]

### ५) फलटण विविध कार्यकारी सोसायटी-

फलटण या तालुक्याच्या मुख्य ठिकाणी फलटण श्रीराम कृषी सहकारी सोसायटीची स्थापना फलटण संस्थानचे अधिपती श्रीमंत मालोजीराजे यांनी इ.स.१९२६ मध्ये केली. या संस्थेच्या कार्यक्षेत्रातून निरा उजवा कालवा जात असल्याने येथील शेतीतून ऊस हे

बागायती पिक घेतले जाते. या ऊस पिकांसाठी भांडवलाची गरज असून या संस्थेच्या माध्यमातून भांडवलाचा पुरवठा केला जातो. त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारली आहे. सन २००० मध्ये या संस्थेचे २८८७ सभासद असून कर्जवाटप साधारणपणे एक कोटी पन्नास हजार रुपये कर्जवाटप करण्यात आले आहे.[१३]

## सारांश -

वरीलप्रमाणे फलटण तालुक्यामध्ये शेतीला भांडवलपुरवठा करण्यासाठी फलटण संस्थानचे अधिपती श्रीमंत मालोजीराजे यांनी सन १९१८ पासून सहकारी चळवळीचा प्रारंभ केला. फलटण संस्थान स्वतंत्र भारतात विलीन होण्यापूर्वी या संस्थानात ६६ सहकारी कृषी सोसायट्या अस्तित्वात होत्या. त्यांनतर सन १९४८ ते २००० या कालखंडात एकूण ११९ कृषी सहकारी संस्था होत्या. आज मित्तीस फलटण तालुक्यात १२८ कृषी सहकारी संस्था असून या सोसायट्यांना सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत १०० कोटीच्या पुढे कर्जवाटप करण्यात आले आहे. यावरुन आपणास असे दिसून येते की, फलटण तालुक्यातील कृषी सहकारी सोसायटयांच्यामुळे शेतीला मुबलक प्रमाणात कर्जपुरवठा होत आहे. त्यामुळे फलटण तालुक्यातील शेतीचे उत्पन्न वाढून शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यास मदत होत आहे.

## संदर्भ


१) फलटण स्टेट गॅझेट १९२६ पृ.१११

२) फलटण संस्थानचा प्रशासकीय अहवाल सन १९२९-३० पृ.१७

३) सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.सातारा पीक कर्जविषयक धोरण पुस्तिका १९८५-८६ पृ.१

४) सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. सातारा पीक कर्जविषयक धोरण पुस्तिका १९८८-८९ पृ. ३,४

५) कित्ता

६) सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. सातारा बँकेचा विविध कर्ज योजना पत्रक १९८९ पृ.१,२

७) सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.सातारा कृषी कर्जविषयक धोरण पुस्तिका १९९९-२००० पृ.१९

८) सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, फलटण यांचे जनरल रजिस्टरवरुन पृ.२५ ते ३०

९) तरडगाव विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि. तरडगाव लेखा परिक्षण अहवाल सन १९९९-२००० पृ. ७ ते १०

१०) राजूरी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि. राजूरी संस्था माहिती रजिस्टरवरुन पृ.१०, १२, १३, १५, १८

११) उपळवे विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि. उपळवे लेखा परिक्षण अहवाल सन १९९९-२००० पृ.१

१२) होळ विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि. होळ लेखा परिक्षण अहवाल सन १९९६-२००० पृ.१

१३) फलटण श्रीराम विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि.फलटण लेखा परिक्षण अहवाल सन १९९६-२००० पृ. ७ ते १२





**Prof. Dr. S.M.Gavade**

**Head, Dept.of History, Mudhoji College, Phaltan , Dist.Satara.**